**"जुलै २०१९" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

**(क) <u>मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त / प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन / पदोन्नती / पदावनती / मानीव दिनांक व नियमित दिनांक इत्यादींच्या आदेशांचा तपशील ...</u>**

| बाब | नियुक्ती | बदली | | | | | | प्रतिनियुक्ती | | | पदोन्नती | | | | | | एकूण अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संवर्ग | नियतवाटप | बदली | मुदतपूर्व बदली | बदलीस स्थगिती | बदली रद्द | पदस्थापनेत बदल | कार्यमुक्त | प्रतिनियुक्ती | प्रत्यावर्तन | प्रतिनियुक्तीस मुदतवाढ | पदोन्नती | पदावनती | प्रपत्र बढती | प्रपत्र बढतीस मुदतवाढ | मानीव दिनांक | नियमित दिनांक | |
| भाप्रसे | -- | ३१ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ३१ |
| उपसचिव | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| अवर सचिव | -- | -- | -- | -- | -- | ५ | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ६ |
| कक्ष अधिकारी | १७ | -- | -- | -- | -- | ३१ | -- | १ | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | ५१ |
| उच्चश्रेणी लघुलेखक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| निम्नश्रेणी लघुलेखक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| लघुटंकलेखक | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |

**(ख) <u>शासन निर्णय / अधिसूचना</u>**

- राज्य शासनाच्या दिनांक १ जुलै २०१९ च्या शासन पत्रान्वये, केंद्र शासनाच्या कार्मिक, सार्वजनिक गाऱ्हाणी व निवृत्तीवेतन मंत्रालय (कार्मिक व प्रशिक्षण विभाग), भारत सरकारच्या दिनांक १५ जून २०१८ च्या अधिसुचनेन्वये, भारतीय प्रशासन सेवा (संवर्ग) नियम १९५४ मधील नियम-४(२) च्या दुसऱ्या परंतुकान्वये Apex Scale : Level 17 in the Pay Matrix या संवर्गातीत एक पद तात्पुरत्या स्वरुपात दिनांक १ जुलै २०१९ पासून दिनांक ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंत निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक ८ जुलै २०१९ च्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त अधिनियम १९७१" यात सुधारणा सुचविण्यासाठी व सक्षम लोक आयुक्त कायदा करण्यासाठी संयुक्त मसुदा समितीतील अशासकीय सदस्य व विशेष निमंत्रितांना दैनिक भत्त, बैठक भत्ता व प्रवास भत्ता याचे दर निश्चित करण्यात आले आहेत.
- दिनांक ९ जुलै २०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ अंतर्गत शासकीय कर्मचाऱ्याच्या निलंबनाचा आढावा घेण्यासंदर्भात सूचना दिल्या आहेत.
- दिनांक ९ जुलै २०१९ च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यमक्रमाकरिता सन २०१९-२० साठी यशदा, पुणे या संस्थेस पहिल्या हप्त्यापोटी रु.३३.३२ लाख इतका निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १० जुलै २०१९ च्या शासन निर्णयान्वये बिगर राज्य नागरी सेवेतून भारतीय प्रशासन सेवेत निवडीने नियुक्तीच्या शिफारशीसाठी पात्रता निकष विहित करण्यात आले आहेत.
- दिनांक २२ जुलै २०१९ च्या शासन निर्णयान्वये सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई येथील भूखंड क्रमांक-१अे, सेक्टर-१० मधील ४७५७.४४ चौ.मी. क्षेत्र फळाची जागा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या हस्तांतरित करण्यासाठी सिडकोस अदा करावयाच्या शुल्काबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

**(ग) <u>प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक १२ जुलै २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी यांच्या कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी सन २०१९ मध्ये घ्यावयाच्या विभागीय परीक्षेच्या प्रशिक्षण आणि परीक्षेसाठी दिनांक ९ ऑगस्ट २०१९ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत.
- दिनांक २३ जुलै २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये सहायक कक्ष अधिकारी प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा २०१९ या परीक्षेला पुन्हा बसू इच्छित असलेल्या उमेदवाराचे अर्ज दिनांक ३ ऑगस्ट २०१९ पर्यंत मागविण्यात आले आहे.

**(घ) <u>ज्येष्ठतासूची</u>**

- दिनांक ३१ जुलै २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन अवर सचिव संवर्गाच्या सन १९९६-९७, १९९७-९८ व १९९८-९९ या कालावधीच्या निवडसूच्या / ज्येष्ठता याद्या, कक्ष अधिकारी संवर्गाच्या ज्येष्ठता यादीनुसार हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ३१ जुलै २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये मंत्रालयीन कक्ष अधिकारी संवर्गाच्या सन १९८६-२००० या कालावधीतील दिनांक १ जानेवारी रोजीची सुधारित तात्पुरती ज्येष्ठता सूची हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

*****

| बाब | बदली | | | | | | प्रतिनियुक्ती | | | पदोन्नती | | | | | | एकूण अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| संवर्ग | बदली | मुदतपूर्व बदली | बदलीस स्थगिती | बदली रद्द | पदस्थापनेत बदल | कार्यमुक्त | प्रतिनियुक्ती | प्रत्यावर्तन | प्रतिनियुक्तीस मुदतवाढ | पदोन्नती | पदावनत | प्रपत्र बढती | प्रपत्र बढतीस मुदतवाढ | मानीव दिनांक | नियमित दिनांक | |
| भाप्रसे | | | | | | | | | | | | | | | | |
| सहसचिव | | | | | | | | | | | | | | | | |
| उपसचिव | | | | | | | | | | | | | | | | |
| अवर सचिव | | | | | | | | | | | | | | | | |
| कक्ष अधिकारी | | | | | | | | | | | | | | | | |
| सहायक कक्ष अधिकारी | | | | | | | | | | | | | | | | |
| वरिष्ठ स्वीय सहायक | | | | | | | | | | | | | | | | |
| निवडश्रेणी लघुलेखक | | | | | | | | | | | | | | | | |
| उच्चश्रेणी लघुलेखक | | | | | | | | | | | | | | | | |
| निम्नश्रेणी लघुलेखक | | | | | | | | | | | | | | | | |
| लघुटंकलेखक | | | | | | | | | | | | | | | | |
| लिपिक-टंकलेखक | | | | | | | | | | | | | | | | |